महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

# पक्षिमित्र

■ वर्ष – बारावे ■ अंक ४ था ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ जुलै २०२२ ■ पाने –२०






## संपादक

**श्री.दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

**सहाय्यक संपादक**

**श्री. किरण मोरे,** अमरावती, मो. ९९२३९१००३४
Email: kiranmorey1983@gmail.com

**श्री. अनिल माळी,** नाशिक, मो. ९८५०८१८६४४
Email: anilrmali@yahoo.co.in

### कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>मो. ९८२२८७५७७३ |
| कार्याध्यक्ष | - | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे<br>मो. ९००४९२४७३१ |
| संघटक | - | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>मो. ९८५०२९१३२४ |
| कार्यवाह | - | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>मो. ९८२२२०४०७० |
| सहकार्यवाह | - | **श्री. शरद आपटे**, सांगली<br>मो. ९८९०३८४४०० |
| सहसंघटक | - | **श्री. अनिल माळी**, नाशिक<br>मो. ९८५०८१८६४४ |
| सदस्य | - | **प्रा. निनाद शाह**, सोलापूर<br>मो. ९४२२४५९९१५ |
| सदस्य | - | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>मो. ९४२२२०२६२८ |
| सदस्य | - | **श्री. रोहन भाटे**, कराड (सातारा)<br>मो. ९४२२००४८०० |
| सदस्य | - | **श्री. सचिन मेन**, पालघर<br>मो. ८४४६२४८८८४ |
| सदस्य | - | **श्री. अनिल महाजन**,वरणगाव-जळगाव<br>मो. ८८०६१९८०४० |

### सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगांबर गाडगीळ | (नाशिक) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


# संपादकीय

## भूतदया




**दिगंबर गाडगीळ**
संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक
dgadgil09@gmail.com


उन्हाळ्याची चालूल लागली की, वॉट्सअॅपवर लोकांचे संदेश फिरू लागतात, 'मातीच्या उथळ भांड्यात पक्ष्यांसाठी पाणी ठेवा, जवळच काही बारीक धान्य, आदल्या दिवसाची भाताची शिते, पोळीचे तुकडे त्यांच्यासाठी ठेवा.' काही वृत्तपत्रे तर त्यासाठी महिना-दोन महिने प्रचार मोहीम राबवितात. मुंबईसारख्या शहरात कबुतरांसाठी पोतीच्या पोती धान्य मैदानात टाकले जाते. काही भूतदयावादी पक्ष्यांसाठी गाठी, फरसाण, पाव असे ठेवतात. आपण पक्ष्यांसाठी मदत करत असतानाच त्यांच्या जीवनक्रमात ढवळाढवळ करत आहोत, याचे ध्यान या मंडळींना राहत नाही. बहुतेक पक्षी किडे-कीटक पकडत असतात. तो त्यांचा नैसर्गिक व्यवहार असतो. त्यांना शिजवलेले, भाजलेले, तळलेले अन्न आयते देऊन त्यांच्या सवयी आपण बदलत असतो. कालांतराने त्यांना परावलंबी करत असतो.

भरीस भर म्हणून काही नगरसेवक आपल्या निधीतून किंवा नगरपालिकेला भरीस पाडून उंचावर त्यांच्यासाठी घरटी करून घेतात. अशा उंच ठिकाणच्या घरट्यांचा लाभ बहुतेक कबुतरांसारखे पक्षी करतात. शहरात कबुतरांच्या वाढीला चालना म्हणजे रोगराईला निमंत्रण, हे त्यांच्या लक्षात येत नाही. आपण पक्षी संरक्षणासाठी हातभार लावला यातच ते रममाण राहतात. पक्षी त्यांना सुरक्षित वाटेल, अशा आडजागी, झाडांच्या सुरक्षित आश्रयाला घरटे करतात. काही लोक आपला परिसर कटाक्षाने स्वच्छ ठेवतात. तो तसा ठेवताना घरट्यासाठी लागणाऱ्या काड्या-काटक्या तिथे पडतील त्या राहू द्या. जमल्यास त्यांच्यासाठी कापूस सहज त्यांना दिसेल, असा ठेवा. भूतदया म्हणून त्यांच्या दाण्या-पाण्याची कृत्रिम सोय करत असताना पक्ष्यांसाठी पाणी उपलब्ध करून द्या. उन्हाळ्यात पाण्याचे स्रोत आटलेले असतात. पक्ष्यांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी धडपड केली तर हरकत नाही; पण त्यांना शिजवलेले, तळलेले अन्न देऊन त्यांना पंगू करू नका.

मुखपृष्ठ - पावसाळी लावा, रंगीत तित्तिर, राखी तित्तिर, पट्टेरी बटलावा    छायाचित्र - समीष ढोंगळे, योगेश चेके, शशांक नगराळे

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

सर्वप्रथम एक आनंदाची बातमी, आपल्या महाराष्ट्र पक्षीमित्रला नुकताच 'आयजीइएन आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक पुरस्कार' जाहीर झाला असून यानिमित्ताने आपल्या चळवळीस व संस्थेच्या आजवरच्या स्वयंपूर्ण कार्यास आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे, विशेष म्हणजे संस्थेस मिळालेला हा पहिलाच पुरस्कार आहे. संस्थेने आजवर पुरस्कारासाठी कधीही कार्य केले नाही आणि कधी तशी अपेक्षा केली नाही किंवा प्रस्तावसुद्धा पाठविला नाही. मात्र संस्थेचे कार्य हे अनेक पुरस्कारांच्या तोडीचे आहे, यात शंकाच नाही.

जगभरात पर्यावरण क्षेत्रात स्वयंपूर्तीने कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांच्यामधील स्वयंसेवकांचा सन्मान व्हावा व त्यांना समाजात ओळख निर्माण व्हावी या उद्देशाने व आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन कार्यक्रमास सहकार्य व्हावे या दृष्टीने इन्स्टिट्यूशन ऑफ ग्रीन इंजिनिअर्स या आंतरराष्ट्रीय संस्थेतर्फे (IGEN) हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी नुकतेच २०२१ चे पुरस्कार जाहीर झाले असून २०२१ चा आंतरराष्ट्रीय आयजीइएन आयव्हीडी स्वयंसेवक पुरस्कार (IGEN IVD Volunteer Reorganization Award 2021) आपल्या संस्थेस जाहीर झाला. महाराष्ट्र पक्षीमित्रच्या चार दशकपूर्ती वर्षात संस्थेस मिळालेला हा पुरस्कार संस्थेच्या आजवरच्या सातत्यपूर्ण कामगिरीची पावती आहे. या पुरस्काराचे श्रेय आजवर अनेक ज्येष्ठ सभासद व आजीवन सभासदांनी केलेल्या कामास जाते. पुरस्कारासाठी सर्व सर्वांचे मनपूर्वक अभिनंदन.

सारस हा राजबिंडा परंतु दुर्मीळ होत चाललेला मोठ्या आकाराचा पक्षी. हा पक्षी महाराष्ट्रात उरलाय तो फक्त राज्याच्या पूर्वेकडील गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात. या भागात दरवर्षी वनविभाग व स्थानिक अशासकीय संस्था यांच्यातर्फे सारस गणना घेण्यात येते. ही गणना नुकतीच जूनच्या दुसऱ्या आठवड्यात पार पडली. या गणनेनुसार गोंदिया जिल्ह्यात ३४, भंडारा जिल्ह्यात ०३ तर शेजारील मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात ४५ सारस आढळून आलेत. यामध्ये चिंतेची बाब ही की, मागील वर्षाच्या तुलनेत ही संख्या ०४ ने कमी झाली. अधिवासावर वाढणारा ताण त्यामुळे प्रजननासाठी निर्माण होणारे अडथळे हे संख्या न वाढण्याचे मुख्य कारण असले तरी अनेक धोके आहेतच. आज प्रशासन, वन विभाग व स्वयंसेवी संस्था सारस संवर्धनासाठी जोमाने काम करीत असताना व लोकांमध्येसुद्धा जनजागृती होत असताना सारस पक्ष्यांची संख्या कमी होणे हा गंभीर इशारा समजण्यास हरकत नाही. अधिवास संवर्धन हे सारस संवर्धनाचे प्रमुख उत्तर आहे, हेसुद्धा लक्षात घ्यायला हवे. गोंदिया जिल्ह्यात सारस संवर्धनासाठी अनेक वर्षांपासून अनेक मंडळी सातत्याने झटत आहेत. त्यामध्ये गोंदिया निसर्ग मित्रमंडळाचे सर्वश्री मुकुंद धुर्वे, संजय आकरे, अशोक पडोळे, सेवा संस्थेचे सावन बाहेकर, भारत जसानी अशा अनेक पक्षिमित्रांचा समावेश आहे. यावर्षी भंडारा जिल्ह्यात घेण्यात आलेल्या सारस पक्षी गणनेत ०३ सारस आढळून आले. त्यासाठी सीट संस्थेचे शाहीद खान व त्यांच्या चमूने पुढाकार घेतला होता. या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि सारस संवर्धनासाठी शुभेच्छा!

सारस पक्ष्याबाबत आणखी एक बातमी आहे. सारस पक्ष्याची इत्यंभूत माहिती मराठीत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने, जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया यांनी 'सारसाची सुरस कहाणी' या पुस्तकाची निर्मिती केली आहे. जिल्हाधिकारी मा. नयना गुंडे

यांच्या संकल्पनेतून निर्मित या पुस्तकाचे संहिता लेखन आमचे मित्र तथा गोंदियाचे अप्पर जिल्हाधिकारी श्री. राजेश खवले यांनी केले असून त्यांच्या प्रयत्नातून हे पुस्तक निर्माण होऊ शकले, असे म्हटल्यास हरकत नाही. या पुस्तकाची प्रत श्री. राजेश खवले साहेबांनी नुकतीच मला पाठविली असून पुस्तक अतिशय उत्तम व माहितीपूर्ण झालेले आहे. उत्कृष्ट रंगीत छायाचित्रांनी नटलेले, मोठ्या आकाराचे, १२० पानी पुस्तक संग्रही ठेवावे असे आहे. या पुस्तकावर लवकरच एक सविस्तर परीक्षण लिहिणार आहे. या पुस्तकाची पीडीएफ सर्वांसाठी समाजमाध्यमातून वितरित करण्यात आली आहे. ती आपल्यापर्यंत पोहोचली असेलच. उत्कृष्ट पुस्तकाच्या निर्मितीसाठी, या प्रकल्पात सहभागी गोंदिया जिल्ह्यातील शासकीय अधिकारी, छायाचित्रकार तसेच श्री. राजेश खवले साहेबांचे मनपूर्वक अभिनंदन.

पक्षी संवर्धनासाठी आज त्यांच्या अधिवासांचे संवर्धन करण्यावर भर देणे गरजेचे असल्याचे सर्वमान्य झाले आहे. आज पाणथळ प्रदेश, गवताळ माळराने, विविध प्रकारचे जंगल अधिवास हे विविध समस्यांनी वेढले गेले असून, अनेक ठिकाणी त्यांची तीव्रता वाढतच आहे. संरक्षित नसलेली गवती कुरणे आणि जंगले असे अधिवास आज झपाट्याने बदलत असून, पाणथळ प्रदेशाची परिस्थिती तर विचित्र अशी आहे. हे प्रदेश संरक्षित नसून त्याच्या मालकी हक्काच्यासुद्धा अनेक भानगडी असल्याने तेथील पाणथळ पक्षी अधिवास व पक्ष्यांचे संवर्धन कसे व्हावे हा मोठा प्रश्न आहे. परंतु गेल्या दोन वर्षांत राज्यातील अनेक जंगलांना व चांगल्या अधिवासांना संरक्षित दर्जा देण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतलेला आहे. त्यामुळे गेल्या दोनच वर्षांत राज्यात अनेक अभयारण्य व संवर्धन राखीव क्षेत्र घोषित झालेले आहेत. प्रथमदर्शनी या निर्णयाचे स्वागत व्हायलाच हवे. भविष्यात या घोषित क्षेत्रात तेथील अधिवास व जैवविविधता संवर्धनाची जबाबदारी निश्चितच वन विभागाची असणार आहे. सोबतच तेथील उणिवा दाखवून सुधारणा घडवून आणण्यासाठी सर्व पक्षिमित्र, स्थानिक माध्यमांचीसुद्धा जबाबदारी वाढणार आहे.

संरक्षित क्षेत्रात होणारी वाढ या दिलासादायक बातमी सोबतच आणखी एक आनंदाची बातमी मेळघाट व्याघ्र प्रकल्पासाठी नुकतीच आली आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या वान अभयारण्यातून गेलेल्या मीटरगेज रेल्वेचे ब्रॉडगेजमध्ये परिवर्तन होत असताना या रेल्वेचा मार्ग वन्यजीव क्षेत्राच्या बाहेरून जावा, जेणेकरून बाहेरील शेकडो गावांना त्याचा फायदा तर होईलच शिवाय वन्यजीव क्षेत्रातसुद्धा धोका कमी होईल. यासाठी आम्ही गेल्या तीन वर्षापासून प्रयत्नशील होतो. ही लढाई विविध स्तरांवर अनेकांच्या प्रयत्नातून सुरू होती. या बाबतीत नुकतीच एक दिलासादायक बातमी समजली. भारताचे गृहमंत्री मा. श्री. अमित शहा यांच्या नेतृत्वात दि. ११ जून रोजी वेस्टर्न झोन कौन्सिलची २५ वी बैठक पार पडली. त्यामधे मेळघाट व्याघ्रप्रकल्पच्या वान अभयारण्यातून जाणारा अकोट-खंडवा हा नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग हा मेळघाटमधून जुन्या मार्गाने न जाता नवीन पर्यायी मार्गाने हिवरखेड, सोनाळा, जामोद, उसरणी, खकनार या मार्गाने केला जाईल, असा महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेतला गेला. यासाठी पुढाकार घेणाऱ्या सर्व शासकीय विभागांचे मनःपूर्वक आभार आणि सर्व सहकारी यांचे अभिनंदन.

महाराष्ट्र पक्षीमित्र साठी नुकतीच एक आनंदाची बातमी प्राप्त झाली, पक्षी व वन्यजीव संवर्धन व संशोधनामध्ये अग्रगण्य अशा बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडनूकीत महाराष्ट्र पक्षीमित्रचे श्री. रोहन भाटे (कराड) आणि मी स्वतः असे दोघे कार्यकारी मंडळावर सदस्य म्हणून निवडून आलो. या शिवाय आपले जेष्ठ सभासद श्री. किशोर रिठे हे बी.एन.एच.एस. च्या मानाच्या अशा मानस सचिव पदी विराजमान झाले, महाराष्ट्र पक्षीमित्रसाठी ही बाब निश्चितच अभिमानास्पद आहे.

*****

# मण्डूकमुखीच्या शोधात...



**भारती धोंडे पाटील**
(९६१९९७१४९५)

निसर्गाची किमया किती अगाध आहे, पक्षी आणि मण्डूक (बेडूक) दोघांचे रंग, रूप, अधिवास यात किती फरक! मण्डूकमुखी हे नाव ऐकताच मी पहिल्यांदा थोडी संभ्रमित झाले की, हे असं नाव; पण या मण्डूकमुखीला पाहिलं आणि निसर्गाच्या या करामतीवर अवाक् झाले.

पांग्रडला जाणं हे अगदी अनपेक्षितपणे ठरलं, अगदी अचानक बसची तिकिटे, सुट्टी सगळं सहज जुळून आलं. यात ही निसर्ग देवतेची इच्छा असेल म्हणूनच सगळं इतक्या सहज जुळून आलं.

कोकणात आपल्याला नारळी-पोफळी, काजू, कोकम यांच्या वाड्या पाहायला मिळतात. सिंधुदुर्ग म्हणजेच तळकोकण. मुसळधार पडणारा पाऊस, दमट हवामान, सदाहरित आणि पानझडी झाडांची दाटी. इथलं हवामान आणि दाट झाडी या वैशिष्ट्यपूर्णतेमुळे ३०० हून अधिक प्रकारचे पक्षी पाहायला मिळतात.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पांग्रड हे छोटंसं खेडेगाव. पांग्रडला जाण्यासाठी कोकण रेल्वेने कुडाळला उतरून तिथून बस-रिक्षा उपलब्ध असतात. बसने आल्यास कुडाळऐवजी पंदूरतिठाला उतरून तिथून पांग्रड रेडेतळवाडीपर्यंत रिक्षा उपलब्ध आहेत.

आमचा मुक्काम पांग्रड रेडेतळवाडी येथे गणेश मर्गज सरांच्या घरीच होता. सायंकाळी गणेश सरसुद्धा सावंतवाडीहून पांग्रडला येऊन पोहोचले. सरांसोबत पक्षी निरीक्षण करणं ही एक पर्वणीच. संध्याकाळी विविध विषयांवर चर्चा झाली. यात खूप काही शिकायला मिळालं. अभ्यासपूर्ण गप्पांची मैफल जमली असतानाच एक रातकिड्याने भेट दिली आणि विषयाचा ओघ नवीन काही तरी शोधण्याकडे वळला. मग काय बेत ठरला की, जेवण झाल्यावर नाईट ट्रेल करायचा आणि या भागात काही वेगळं दिसतंय का ते पाहायचं.

रात्री १० नंतर आम्ही टॉर्च कॅमेरा सरसावून निघालो, कृष्णपक्ष अष्टमी असल्याने बऱ्यापैकी काळोख होता. गाव तसं इटूकलं पिटूकलं, डोंगराच्या कुशीत वसलेलं, घरांमागे लगेचच डोंगराची चढण असलेलं. गावाशेजारून वाहणारी नदी आणि खडकातून ओझरणाऱ्या जिवंत झऱ्यांमुळे तयार झालेले पाणवठे. तर ठरलं असं की, या पाणवठ्यांच्या आसपास काही वेगळं दिसत का हे पाहायचं. असा विचार ठरवून गणेश सर, विकास, मी आणि अनुष्का (गणेश सरांची मुलगी) पायवाटा धुंडाळत निघालो. वाटेवर सर्वांत पहिल्यांदा आम्हाला एक सेंटीपेड पाहायला मिळाला. त्याचे फोटो घेऊन आम्ही जंगलाच्या वाटेवर असलेल्या पाणवठ्याकडे निघालो. तिकडे 'गेको लिझार्ड'ने दर्शन दिलं आणि त्याच वेळी कानावर एक आवाज पडला. आवाजावरून तरी आसपास मण्डूकमुखी आहे याचा अंदाज आला आणि मग मात्र आम्ही चौघेही उत्साहित झालो की, याला शोधायचंच. आमच्या हातातील टॉर्च बंद करून शांत उभे राहून आम्ही कानोसा घेऊ लागलो.





आवाजाच्या दिशेचा अंदाज येत नव्हता, पण आवाज देणारा जवळच आहे हे मात्र नक्की! शोध मोहीम सुरू केली, जंगलात आत-आत जाऊ लागलो तर आवाज अस्पष्ट होऊ लागला, यावरून अंदाज आला की, आपण चुकीच्या दिशेने जातोय, पुन्हा मागे फिरून आलो. एव्हाना तो शांत झाला होता. आता पुन्हा तो आवाज देईस्तोवर आम्ही त्याला शोधणं थोडं अवघड होत, आम्ही नदीकाठी त्याला शोधण्याचं ठरवलं आणि नदीपात्राकडे गेलो; पण तिथंही हाती काहीच लागलं नाही. पुन्हा मागे फिरून घराच्या दिशेने निघत असताना त्याने पुन्हा आवाज दिला, आशा पल्लवित झाल्या. कारण आता आलेला आवाज हा सुस्पष्ट आणि जवळून आला होता.

एव्हाना रात्रीचे ११.१५ वाजले होते, तासाभरापेक्षा जास्त रपेट झाली होती, थोडासा थकवा आला होता; पण आवाज आला म्हटल्यावर पुन्हा स्फुरण चढलं. घरांच्या थोडं मागच्या बाजूला डोंगराची चढण सुरू होते, तिथे आलो आणि पुन्हा त्याचा आवाज आला आणि खात्री पटली की, हा इथंच आहे. झाडांवर टॉर्चचा उजेड करून आमची शोध मोहीम सुरू झाली आणि पानं गळून गेलेल्या एका झाडाच्या फांदीवर आम्हाला दिसली मण्डूकमुखी मादी... कॅमेरे सरसावून फोटो घेतले. पंखाच्या बाजूने व पाठीमागे बदामी रंगावर पांढरे ठिपके असलेली ही मादी, आकाराने अगदीच लहान, रंग आणि आकार झाडाच्या फांदीशी मिळता जुळता असलेली आमच्या नजरेस पडली. तिची भेदक नजर, मान फिरवणं हे पाहून ती पाहताच 'बाला कलिजा खलास झाला...' अशाच काहीशा भावना निर्माण झाल्या. मादीचे फोटो घेत असताना अगदी जवळून आणखी एक आवाज आला. मागे वळून पाहिले तर मागच्या बाजूला असलेल्या झाडावर मण्डूकमुखी नर बसला होता... ऐटदार मजबूत पकड असलेला, भेदक नजरेचा, संपूर्ण शरीराचा रंग हा वाळलेल्या लाकडाच्या सालीसारखा राखाडी असलेला नर आवाज देत होता. जणू आम्हाला सांगतोय, मी तिच्यापेक्षा जास्त सुंदर मॉडेल आहे, माझे फोटो घ्या! मनसोक्त फोटो घेऊन आम्ही निघत असताना आणखी एका नर मण्डूकमुखीचा आवाज कानावर पडला आणि हे निश्चित झालं की पांग्रडमध्ये आताची मण्डूकमुखीची संख्या कमीत कमी तीन तरी आहे.

बेडकाच्या तोंडासारखे तोंड असल्याने त्याला मराठीत मण्डूकमुखी (बेडूकतोंड्या) असेही म्हणतात. मण्डूकमुखी मुख्यत्वे करून दक्षिण भारतात पश्चिम घाटात व श्रीलंकेत पाहायला मिळतात. भारतीय द्विपकल्पात आढळणाऱ्या मण्डुकमुखीचा प्रजननाचा काळ हा जानेवारी ते एप्रिल दरम्यान असतो तर श्रीलंकेत आढळणाऱ्या मण्डुकमुखीचा प्रजननाचा काळ हा फेब्रुवारी-मार्च असतो. पिलांचा सांभाळ करणे ही जबाबदारी नर आणि मादी दोघेही वाटून घेतात.

Batrachostomus monilige असं याच वैज्ञानिक नाव आहे तर Sri Lanka Frogmouth असं सामान्य नाव आहे. 'श्रीलंकन फ्रॉग माउथ' म्हणजेच बेडूकमुखी हा पक्षी घुबडांच्या प्रजातीत मोडत नाही आणि नाईटजारच्या वर्गातही गणला जात नाही.

बरेचदा या पक्षाचा रात्रीचा वावर, चेहऱ्याची ठेवण, चोच, डोळे इत्यादी बाबींचा विचार करून तो घुबडाच्या वर्गात गणला जातो. वाचनात आलं आहे की, बेडूकमुखी हा घुबड आणि नाईटजार या दोन वेगळ्या पक्ष्यांची संकरित प्रजाती आहे.

दिवसा सहसा नजरेस न पडणाऱ्या या पक्ष्यांचा रंग आणि आकार निसर्गाशी खूपच मिळताजुळता आहे. दिवसा घनदाट जंगलात विश्रांती घेणं आणि रात्री भक्ष्य शोधण्यासाठी बाहेर पडणं हा जीवनक्रम असणारा हा निशाचर मण्डूकमुखी... माझ्या पक्षी निरीक्षणात एक नवीन रत्न कोंदणात जडवलं गेलं मण्डुकमुखी...

शोध मोहिमेत सहभाग : डॉ. गणेश मर्गज, विकास विलास कोलते, भारती धोंडे पाटील, अनुष्का मरगज.

प्रकाशचित्र : डॉ. गणेश मर्गज

शब्दांकन : भारती धोंडे पाटील

(९६१९९७१४९५)



# पक्षी आम्ही सारे



**मेघा सुर्वे**
महाराष्ट्र पक्षीमित्र
जिल्हा प्रतिनिधी, मुंबई.

**नमस्कार माझ्या पक्षी मित्र आणि मैत्रिणींनो,**

मीही तुमच्यासारखीच पक्षीप्रेमी आहे. पक्ष्यांबद्दल काळजी वाटते म्हणूनच थोडं बोलावं वाटतं. आपण या निसर्गाचं काही देणं लागतो याची जाणीव आपल्याला आहे म्हणूनच आपण 'पक्षीमित्र संघटने'चा भाग आहोत, हे मी वेगळं सांगायला नको. आपणा सगळ्यांनाच निसर्ग आणि पक्ष्यांबद्दल काळजी आणि जिव्हाळा आहे. पक्षी मित्र म्हणजे पक्ष्यांचे मित्र आणि मित्र म्हटलं की, ते मदतच करणार. त्यांची काळजी घेणार. त्यांचं रक्षण करणार. पक्षी संवर्धनासाठी जनजागृती हेच तर आपल्या सर्व पक्षी मित्रांचे प्रमुख लक्ष्य. म्हणजे पक्ष्यांच्या संवर्धनासाठी काय करायला पाहिजे, याचे चिंतन करणे व त्यासाठी प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे.

मात्र फोटोग्राफी केली की पक्षी मित्र झालो, असं काहीसं समीकरण रुढ होत चाललं आहे. सतत पक्ष्यांचे फोटो काढल्याने पक्षी संवर्धनासाठी काही उपयोग होतो का? उलट नेचर फोटोग्राफीच्या लोकप्रियतेमुळे नकळतपणे पक्ष्यांच्या परिसंस्थेत मानवी हस्तक्षेप होऊ लागला आहे. प्रजातींच्या वर्तनात बदल होत आहेत. त्यांच्या निवासस्थानात अडथळा निर्माण होत आहे. परिपूर्ण शॉट घेताना अनेक कीटक वनस्पती कळत-नकळत पायाखाली तुडवले जातात. ज्यावर तेथील सजीवांचे जीवन अवलंबून असते. शिवाय जंगली लॅण्डस्केप वारंवार इकोसिस्टिमचं नुकसान होत चाललं आहे. घरटे किंवा गुहेची छायाचित्रणं आणि रात्री निशाचर प्राण्यांवर क्लीक करणे यामुळे वन्यजीवन खूप धास्तावले असावे.

हे प्रेम आहे की, स्वत:चे मनोरंजन? खरंच याचा विचार आपण केला पाहिजे. पक्ष्यांवर प्रेम असेल तर त्यांना शांतपणे त्यांचे जीवन जगू द्या. शक्यतो नैसर्गिक पद्धतीने त्यांचे निरीक्षण करा. एवढ्या प्रमाणात फोटोग्राफीची खरच गरज आहे का, याचा वेळीच विचार व्हायला हवा. आपण पक्ष्यांचे मित्र आहोत शत्रू नाही. त्यांना त्रास होईल, अशी कोणतीही कृती आपल्याकडून होता कामा नये, असे मला वाटते. नाही तर हे पक्षी प्रेमच पक्ष्यांच्या नाशाला कारणीभूत ठरेल आणि 'फोटोग्राफीपासून पक्षिजीवन, वन्यजीवन वाचवा' अशी आंदोलनं करावी लागतील.

पक्षी अभ्यास व संशोधनासाठी किती फोटोग्राफीची गरज आहे, याचा विचार व्हायला हवा. शास्त्रशुद्ध प्रशिक्षण झाले असेल तरच फोटोग्राफीला परवानगी दिली जावी, नाही तर प्लास्टिक पिशव्यांसारखी गत व्हायची. आधी छान छान वाटल्या आणि आता त्याचे दुष्परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत. कोणत्याही गोष्टीचा प्रसार करण्यापूर्वी त्याचा भविष्यकाळातील दूरगामी परिणामांचा अभ्यास होणे महत्त्वाचे. कोणतीही कृती, शोध किंवा प्रकल्प शाश्वत हितकारक असला पाहिजे.

आपण ज्या कॉलनीत, गावात, कार्यालयात कार्यरत असू तेथील लोकांत खालील जनजागृती करू शकतो.

१) पक्षी मित्र सभासद करून घेणे.

२) परिसंस्थांचे जतन करणे, निसर्ग समतोल हा पक्षी, प्राणी वा मनुष्य साऱ्यांच्याच संवर्धनाचे मूळ आहे. म्हणून मूळ उपाय निसर्ग समतोल राखणे आवश्यक आहे. त्यासाठी एनजीओ किंवा शासकीय संघटनांच्या मदतीने ठोस कार्यक्रम आपापल्या गावात राबविणे आवश्यक आहे.

३) पक्षी/प्राण्यांना दगड न मारणे.

४) त्यांची गरटी न पाडणे.

५) खिडक्यांना डेकॅल्स ॲण्ड फ्रॉस्टेड काच वापरणे.

६) शेतीसाठी नैसर्गिक कीटक नाशकांचा वापर करण्यास प्रवृत्त करणे.


७) कचऱ्याची योग्य विल्हेवाट.

८) वाहने चालवताना पक्षी, प्राणी चिरडला जाणार नाही, याची दक्षता घेणे.

९) पाळीव जनावरांपासून पक्ष्यांचे रक्षण करणे.

१०) प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर मर्यादा. यासारखे विचार लोकांपर्यंत पोचविण्याचे कार्य व उपक्रम आपण राबविले तरच पक्ष्यांचे खरे मित्र ठरू.

# लक्ष वेधणारे पक्षी



**बाळासाहेब कुलकर्णी**
(९८२२४६५४१०)

निसर्ग आपला मित्र आहे. निसर्गातील घटकांशी आपली मैत्री असते. त्यात काही जणांना पक्ष्यांविषयी आवड निर्माण होते. त्यांच्या विषयीचा जिव्हाळा जपत पक्ष्यांशी मैत्री होते. आठवा आपले मूळ गाव, खेडे, नगर, शहर. आपले पूर्वज, आजी-आजोबा मोठ्या वाड्यात राहात होते. वाडा म्हणजे अंगण, ओसरी, माजघर, परसदार, माळवद, परसबाग. झाडांचं सान्निध्य, गावकुस, शेते, ओढे, नद्या अशा परिसरात पक्ष्यांचाही वावर असायचा. त्यात चिमणी म्हणजे छोटा पक्षी तर अंगणात कायम दिसायचा. अंगणातील वळचणीला घरटेही करीत असायचा. त्यांच्या सहवासात आपल्याला आठवते ते गाणे-

'येगं येगं चिऊ, दाणा खा, पाणी पी, भूर्र उडून जा!' लहानश्या चिमणी पक्ष्यांची जवळीक, ही तर आपल्या कुटुंबातील लहान बाळाला 'चिमण्या बाळ' या नावाने संबोधून साधली जात असे.

अशा रीतीने आपल्याला आपण राहत असलेल्या परिसरातील पक्ष्यांची ओळख होत जाते. चिमणी, कावळा, साळुंकी, होला, पोपट, बगळे, टिटवी, घार, बुलबुल आदी पक्षी कुळातील पाखरांची नजरभेट होते. त्यातूनच आपल्याला पक्षिनिरीक्षणाची ओढ लागते. मलाही अशाच रीतीने गावी रहात असताना बालपणापासून पक्ष्यांची ओढ निर्माण झाली. त्यावेळी आमच्या खेडेगावातील वाड्यात ओसरीवर एका पिंज-यात पोपट पाळलेला होता. ही आठवण सत्तर वर्षांपूर्वीची आहे. मी पहिल्यांदा मोर बघितले ते संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाची रचना केली त्या नेवासा येथील पसायदानाचा खांब असलेल्या मंदिरासमोरील आंब्याच्या बागेत. तेही साठ वर्षांपूर्वी. तेव्हापासून पक्षिनिरीक्षणाचा छंद वाढीस लागला. पक्षिमित्रांची ओळख, परिचय वाढत गेला. त्यांच्याबरोबर अनेक ठिकाणी बागा, माळराने, नद्या, ओढ्याकाठीचा परिसर , डोंगर-दऱ्या, जंगल अशा अनेक ठिकाणी पक्षिनिरीक्षणासाठी उपस्थित राहून आनंद घेतला. पक्षिमित्रांनी एकत्र येत पक्षिमित्र मंडळाची, निसर्गमित्र मंडळाची स्थापना केली.



अनेक पक्षिमित्रांनी हा छंद जोपासत आपली वाटचाल पुढे सुरू ठेवली आहे. महाराष्ट्रात पक्षिमित्र संमेलने आयोजित होऊ लागली. मित्रपक्ष्यांच्या सहवासात पक्षिमित्र एकत्र येऊन निसर्गाचा आनंद घेत आहेत. पक्षिनिरीक्षणाचा छंद जोपासत आहेत. मात्र माझा सहभाग हा चिमणी एवढाच आहे.

# पुस्तक परिचय
# स्वप्नामधील गांवा

नाशिकच्या पक्षिमित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विनय ठकार यांना निसर्गातील पशू-पक्ष्यांना आपल्या कॅमेऱ्यात बंद करण्याचा छंद होता. दर तीन-चार वर्षांनी ते कोणत्या ना कोणत्या सफरीवर जात व तेथील विशेष पशू-पक्ष्यांचे चित्रण करत. परत आल्यावर नाशिकमधील पक्षीप्रेमींसाठी किमान एक स्लाईड-शो करत. या प्रत्येक सहलीत त्यांची सहचारिणी डॉ. प्रतिभा सोबत असे.

कित्येक  दिवस त्यांना उत्तर ध्रुवावरील पांढऱ्या अस्वलांच्या भेटीला जाण्याची ओढ होती. ती जून २०१८ मध्ये सफल झाली. या सफरीनंतर त्याच्या स्लाईडही तयार झाल्या; पण त्यांचा शो होऊ शकला नाही. कारण ऑक्टोबर २०२० मध्ये डॉक्टरांना कोरोनाला शरण जावे लागले. त्यांच्या मृत्यूनंतर डॉ. प्रतिभा यांनी ती भेट शब्दबद्ध केली. डॉक्टरांच्या स्मृतिदिनी ते पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याचे स्वरूप एखाद्या कॉफी टेबल बुकप्रमाणे झाले. त्यात पांढऱ्या अस्वलाबरोबरच मादागास्करमधील दीर्घजीवी कासव, वैशिष्ट्यपूर्ण लेमूर, केनिया, टांझानिया, झिम्बाव्बे, नामिबियामधील वन्य प्राण्यांची प्रकाशचित्रे छापली गेली.

प्रत्येक सफरीत डॉक्टरांनी केवळ प्रकाशचित्रणावर लक्ष केंद्रीत केले होते. लेखणी कटाक्षाने दूर ठेवली होती. त्यांच्या मृत्यूनंतर ती डॉ. प्रतिभा यांनी चालवली व एका देखण्या पुस्तकाला समोर आणले. लेखणी चालवताना भाषेचे बंधन पाळले नाही. त्यामुळे अनेक ठिकाणी ती इंग्रजी-मराठीतून प्रकट झाली आहे. पुस्तक नाशिकच्या कलावंतांनीच सजवायचे आहे, या आग्रहापोटी नाशिककरांनी चित्रे व मजकूर उजेडात आणला आहे.

डॉ. प्रतिभा यांनी पुस्तकाबद्दल कुठेही कॉफी टेबल बुक हा शब्द वापरला नसला तरी त्याचे स्वरूप व आकार तसाच झाला आहे.

**-दिगंबर गाडगीळ**

**स्वप्नामधील गांवा**



**डॉ. प्रतिभा विनय ठकार**

प्रकाशक अस्टीमेट असोसिएट्स, नाशिक.

पृष्ठे : १९२

मूल्य : रुपये २५००/-



*****

# संधिवात : पक्षिनिरीक्षण आणि छंद



**डॉ.नयना पाटील**
९८९०९०९२५२

कोकणातील वानोशी होम स्टे. संध्याकाळचे ४ वाजले. आम्ही पक्षिनिरीक्षणास नदीकिनारी दाट झाडांच्या रानात गेलो. तेथील चढण सहकाऱ्यांच्या मदतीने चढले. माझ्या शक्तीप्रमारे तेथे पक्षिनिरीक्षण केले व तेथेच ओंडक्यावर बसले. बाकी सहकारी पुढे गेले. संध्याकाळचे ६.३० वाजले. अंधार पडू लागला. भोवताली चिडीचूप शांतता, रानात मी एकटी. १५ मिनिटांनी समोरच्या झाडीतून फूऽऽस्स, फूऽऽस्स आवाज आला. आवाज सारखा सुरूच होता. अंगावर भीतीचे शहारे आले. पटकन उठले. परत निघाले. माझी काठी, मोबाईल व गळ्यात दुर्बीण. मोठी उतरण आली. पुढे गेलेले सहकारी आले नव्हते. उतरण दगड-धोंड्यांनी भरलेली. ओबडधोबड, पाय ठेवायलाही जागा नाही. तीव्र उताराची. तोल सांभाळून उतरणे अवघड काम. मोबाईलच्या प्रकाशात जागा पाहिली. काठी एका हातात धरून खाली वाकून बाजूची जमिनीची कड पकडली व एक पाऊल पुढे ४ इंच टाकले. उभी राहिले. असेच करत १५ मिनिटांनी ती उतरण उतरले. दुसरी उतरणही अशीच उतरले. मनात भीती होती. रात्रीची नदीकिनारी पाणी पिण्यास येणाऱ्या रानटी प्राण्यांची. पुढे गेलेले सहकारी अजून आले नव्हते.

परतताना मला खूप आनंद झाला. असे धाडस मी इतरवेळी केलेच नसते. केवळ या पक्षिनिरीक्षणाच्या छंदाने मला ही संधी दिली. मला आत्मविश्वास आला की, संकटात मी संधिवातावर मात करते.

मी ७६ वर्षांची आहे. २२ वर्षांपासून संधिवाताने ग्रस्त. जो शत्रूलाही कधी होऊ नये, असा गंभीर आजार. यात शरीरातील सर्व लहान-मोठे सांधे कोणत्याही वेळी सुजतात, दुखतात, जखडतात व हालचाल करण्यास अवघड होते. १० वर्षांपूर्वी (२०१३ साली) महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे सहकार्यवाह श्री. शरद आपटे सर यांची योगायोगाने गाठ पडली. मी त्यांच्या बर्डसाँग क्लबमध्ये दाखल झाले व वयाच्या ६७ व्या वर्षी प्रथमच पक्षिनिरीक्षणास सुरुवात केली.

सुरुवातीला सांगली शहर व शहराच्या आसपास पक्षिनिरीक्षण केले. पुढे जवळच्या सातारा, कोल्हापूर व पुणे जिल्ह्यात जाऊन केले. लांब अंतरावर गेल्यावरही काही त्रास होत नाही, असे दिसल्यावर आत्मविश्वास आला. मग मी ३/६ दिवसांच्या शिबिराला जाऊ लागले.

रोजच्या व्यवहारात संधिवाताच्या रुग्णाला काही सुविधा लागतात; पण शिबिराच्या सुरुवातीपासून तो संपेपर्यंत शरद आपटे सर व त्यांचे स्वयंसेवक माझी सर्व काळजी घेतात. त्यामुळे मी आजपर्यंत १५ शिबिरे केली. या शिबिरांमुळे मला खूप सुंदर पक्षी जाती पाहाण्यास मिळाल्या. आता कुटुंबासह प्रवासाला जाताना माझ्याकडे दुर्बीण व कॅमेरा बरोबर असतो.

२०१८ मध्ये मला एक कल्पना सुचली. आपटे सरांसह सलग दर रविवारी पक्षिनिरीक्षणाला सुरुवात केली. पुढे ग्रुप वाढत गेला व सलग ५० रविवारी वेगवेगळ्या ठिकाणी पक्षिनिरीक्षण केले.

नंतर मी गुगल सर्च करून सांगली जिल्ह्यातील तलाव शोधले, दर गुरुवारी एकेक तलावावर गेले. यामुळे पक्षिनिरीक्षणास नवीन तलावांच्या जागा सापडल्या.

पहिल्या पक्षिनिरीक्षणापासून आजपर्यंतच्या प्रत्येक पक्षिनिरीक्षणाची मी वहीमध्ये व्यवस्थित नोंद केलेली आहे. मी आजअखेर २४८ पक्षीजाती पाहिल्या आहेत. पक्षी फोटोग्राफी मी फारशी करत नाही. त्यापेक्षा पक्षी पूर्णपणे न्याहाळणे मला आवडते.

मला वाचण्याची आवड असल्याने माझ्याकडे पक्ष्यांवरची ४० पुस्तके आहेत. पक्षिनिरीक्षणास माझे पती डॉ. विलास यांचा पूर्ण पाठिंबा आहे. त्यांची मला खूप मदतही होते. माझ्या कारचे वाहक श्री. आनंदराव जाधव यांचीही मला खूप मदत झाली. अगदी पहाटेसही ते वेळेवर येत. पक्षिनिरीक्षणाच्या ठिकाणी वेळेत व्यवस्थित पोहोचवत. संधिवातातील माझी महत्त्वाची सहकारी म्हणजे माझी काठी. २०१४ मध्ये संधिवाताचा उद्रेक झाला. सर्व सांधे जखडले. बरे वाटल्यावर संधिवाताच्या या आजारात हातात प्रथमच काठी आली.

त्यावेळी वाटले होते, आता फक्त एक वर्षच तर झाले आहे पक्षिनिरीक्षणाची सुरुवात होऊन. अजून आपल्याला पक्षी जगत खूप पाहायचे आहे. मग मी ठरवले, या आजाराच्या जोखडातून मुक्त व्हायचेच. या निर्णयावर मी ठाम राहिले. चार महिन्यांनी जरा बरे वाटल्यावर एकटीनेच एका पाणथळीच्या ठिकाणी जाऊन पक्षिनिरीक्षण केले. मनाला खूपच आनंद झाला. आत्मविश्वास आला. नंतर क्लबतर्फे पक्षिनिरीक्षणास जाण्यास सुरुवात केली.

दगडधोंड्यांतून, शेतातून, नदी, तलावाच्या काठावरून चालू लागले. उत्साहाने डगरी चढ-उतार करू लागले. यावेळी दुखण्याकडे लक्ष जात नव्हते. अशा चालण्याने गुडघे व पायाच्या इतर सांध्यांना नकळत चांगला व्यायाम झाला. त्यामुळे चालण्याचा वेग वाढला. जास्त वेळ उभे राहणे जमू लागले. गुडघे व पायांची ताकद वाढली. यामुळे परत पक्षिनिरीक्षण जोमात होऊ लागले. माझे जीवन या पक्षिनिरीक्षणाच्या छंदामुळे सुखाचे व आनंदाचे झाले.

माझे जे अनेक छंद आहेत तेही मी परत सुरू केले. अशा छंदांमुळे मला दिवस कसा संपतो कळत नाही. संधिवाताचे दुखणे मी विसरते. जीवनाकडे पाहाण्याचा माझा दृष्टिकोन सकारात्मक आहे. पक्षिनिरीक्षण हा तर अत्यंत सुंदर, निसर्गाशी नाते जोडणारा छंद आहे. तो साद घालतो, 'चला निसर्गाकडे...'

अधिक माहितीसाठी आणि मुलाखत ऐकण्यासाठी https://youtu.be/3SbwRUeHAt4 या वेबसाईटला भेट द्या.

*****

# टपाल तिकिटांच्या दुनियेत

## NORTHERN PINTAIL
## तलवार बदक

**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in




पिनटेल हे थंडीमध्ये युरोप व उत्तर आशियामधून भारतात स्थलांतर होणारे बदक आहे. त्यांचे मोठे थवे आपणास पाणथळ जागांवर दिसून येतात. चॉकलेटी रंगाच्या या बदकाच्या गालावर पांढरी रेघ गळ्याकडे जाताना दिसते. पंखावर सुंदर नक्षीकाम असते व टोकदार लांब शेपूट तलवारीसारखी दिसते. शरीराशी ३० अंशाचा कोन करून ही शेपटी वरच्या बाजूस असल्याने सहजरीत्या दिसते म्हणूनच या बदकास 'तलवार बदक' असे म्हणतात.

हा पक्षी आपले अन्न शोधण्यासाठी उथळ पाणी असलेल्या पाणथळीवर डुंबत राहतो. शक्यतो आपले खाद्य तो संध्याकाळी किंवा रात्री शोधतो. पाण्यात पोहताना शेपूट वर करून व डोके पाण्यात खुपसून पाणवनस्पती, कंद, शंख, शिंपले व लहान मासे यांचा शोध घेतो. ते काही प्रमाणात किडे, कीटक व शेतातील धान्यसुद्धा खातात.

पिनटेलचा विणीचा काळ एप्रिल ते जून महिन्यात असतो. युरोप, उत्तर अमेरिका व उत्तर आशियाच्या दलदलीच्या व खुरट्या गवताळ प्रदेशात ते आपली घरटी तयार करतात. मादी एका वेळी ७ ते ९ निळसर हिरव्या रंगाची अंडी देते.

पिनटेल्सची संख्या गेल्या चाळीस वर्षांत १० लाखांवरून ३ लाखापर्यंत कमी झाली आहे. आक्रसणारा पाणथळींचा प्रदेश, नष्ट होणारे गवताळ प्रदेश, शेतीसाठी होणारा अधिवास क्षेत्राचा वापर तसेच मानवाकडून होणारी शिकार व इतर प्राण्यांद्वारे होणारी शिकार या सर्व कारणांमुळे पिनटेल्सच्या अस्तित्वास धोका निर्माण झाला आहे.

अशा आकर्षक तलवार बदक पक्ष्यावर येमेन रिपब्लिक देशाने १९९० साली एक टपाल तिकीट व मिनीयेचर शिट प्रकाशित केले आहे.

# गोष्ट एका घरट्याची

नीला मालेगावकर
८६६९६६२४३४

यंदाच्या फेब्रुवारीतील घटना आहे. २०-२२ तारखेच्या दरम्यान सकाळी-सकाळी आमच्या गेटजवळील विटांच्या मनोऱ्यापाशी एक काळा पक्षी खाली-वर उडून काहीतरी उचलण्याचा प्रयत्न करीत होता. घराशेजारी नवीन बांधकाम चालू होणार असल्यामुळे त्यांनी बऱ्याच विटा आणून रचल्या होत्या. त्या विटांच्या तळाशी तुटलेल्या विटा, दगड, झुडपे आदी डबर होते. त्यातील एक लाल चिंधी चोचीत पकडून उचलण्याचा हा पक्षी खूप प्रयास करीत होता; पण तो काही चिंधी उचलू शकत नव्हता. त्याला ती चिंधी विटांच्या एका पोकळीत न्यायची होती. त्याला थोडी मदत करावी म्हणून आम्ही चिंधी 'त्या' पोकळीजवळ ठेवली; पण त्याने तिच्याकडे दुर्लक्ष केले. पक्ष्यांना स्वावलंबन प्रिय असते.

आता आम्हाला त्याचे निरीक्षण करण्याची नामी संधी मिळाली. आमच्या बागेतील झोपाळ्यावर बसून आम्ही त्याचे व्यवस्थित निरीक्षण करू शकत होतो. त्याच्या नकळत त्याला त्रास न देता! दुसऱ्याच दिवशी आमच्या लक्षात आले की, हा पक्षी 'इंडियन रॉबिन' (चिरकू कलचुरी) ह्या जातीचा आहे. नर व मादी दोघांचे भरपूर निरीक्षण करता आले. रोज सकाळ-संध्याकाळ एक ते दीड तास निरीक्षणात जायचा. आम्ही 'इंडियन रॉबिन'चे घरटे कधी बघितले नव्हते. इतक्या उन्हाळ्यात घरटे बांधून पिल्लांना हा कसे खायला घालणार याची काळजी वाटत होती. मग पुस्तकात वाचले तर हाच या पक्ष्याचा विणीचा हंगाम होता. त्याने विटांच्या पोकळीत घरटे करून निवारा चांगला शोधला होता. घरट्यात थोडे सुके गवत दिसत होते. घरट्यात इतर आणखी काय घातले होते ते बघायला जवळ गेलो नाही.



नर खूप सतर्क व जागरूक होता. आम्ही आमच्या गेटजवळ उभे असलो तरी वरून ओरडायचा व अस्वस्थ व्हायचा. घराच्या आसपास मांजरे खूप फिरत असतात, त्यामुळे तो सतत लक्ष ठेवून असायचा. घरटे बांधून झाल्याला महिना झाला तरी विशेष धावपळ दिसत नव्हती. खायला घेऊन येण्याची गडबड दिसेना. मग २-४ दिवसांनी नर, मादी दोघांच्या चोचीत पिलांसाठी खाद्य दिसायला लागले. आम्ही पण पिल्लांची चिवचिव ऐकण्यास उत्सुक झालो होतो; गेटजवळ वा अगदी घरट्याजवळ जाऊनसुद्धा पिल्लांचा आवाज ऐकू येत नव्हता. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात एके दिवशी सकाळी आम्हाला पिल्लाचे डोके दिसले. आम्हाला खूप आनंद झाला. आता पिले लवकर बाहेर येतील, असे वाटू लागले. ३-४ दिवसातच तो क्षण आला. सकाळी आम्ही बागेत असताना नराची वेगळीच लगबग दिसली. त्याचे ओरडणे पण वेगळेच भासले. आमच्या डोळ्यांदेखत एक पिल्लू घरट्यातून बाहेर पडून अडखळत खाली स्थिरावले. नर व मादी तारेवर बसून सतत लक्ष ठेवत होते. आम्हाला पण त्याची खूप काळजी वाटत होती. कारण

मांजरे आता तर ते अतिशय असहाय्य होते व पिरिस्थिती फार धोकादायक होती.

नर मात्र खूपच सतर्क झाला होता. मादीपण सतत पिल्लावर लक्ष ठेवून होती. नराने एकदा उडून मांजराचा पाठलाग केला होता; पण त्यावेळी पिल्लू घरट्यात सुरक्षित होते. आता आम्हीपण मांजरावर लक्ष ठेवून होतो व सारखे पिलांकडे लांबून लक्ष ठेवून होतो. फारच गोंडस पिल्लू होते. ते त्यांचे पंख खूप छोटे होते, त्यामुळे ते उडू शकत नव्हते. बराच वेळ ते तिथे बसून होते. त्यामुळे आम्हीही त्याला न्याहाळण्यात दंग होतो व मोबाईल कॅमेऱ्यात फोटो काढून घेतले व परिचितांना पाठविले.

पहिले पिल्लू बाहेर आल्यावर नंतर नर काहीतरी खाद्य घेऊन घरट्यात गेला त्यामुळे आम्हाला वाटले की, अजून एक पिल्लू घरट्यात आहे की काय? पण नंतर घरट्यातून काही हालचाल दिसेना. थोड्यावेळाने पिल्लांच्या आई-बाबांनी त्याला विटांच्या भितींच्या दुसऱ्या बाजूला नेले व तेथील दगड व झुडपात बसविले. बराच वेळ त्याचा मुक्काम तिथे होता. तिथे पण खूप धोका होता. काही वेळानंतर त्याचे आई-बाबा समोरच्या बंगल्याच्या तारेवर व कुंपणावर बसलेले दिसले. त्यावरून ते पिल्लू त्यांच्या बागेतील झुडपात बसलेले असणार, असा अंदाज केला. आम्हाला ते तिथे जमिनीवर, झुडपाआड बसलेले दिसले व आम्ही निःशंक झालो. आम्हाला पुढील दोन दिवस ती नर-मादी समोर तारेवर दिसत होती. एका सुंदर पिल्लाला या जगात आणून आई-बाबा समाधानी झाले होते व त्यांचा यशस्वी प्रवास बघण्याचा आनंद आम्ही अनुभवला होता.

*****

## येरे-येरे चिऊ...

एक होती चिऊ
तिला झाला बाऊ
लंगडत लंगडत चाले
हसत होता काऊ.

गेला ऊडून काऊ
तहानली होती चिऊ
दाणे दिले खायला
वाटीत दिला प्याऊ.



पिलांना ही चिऊ
भरवित होती खाऊ
पाळण्यात लागले
बाळ टक मक पाहू.

टक मक नको पाहू
लवकर येते चिऊ
जो जो जो बाळा
गाणं कोणतं गाऊ.

येशील का ग चिऊ
तुला देतो खाऊ
पाळण्यात बाळाला
झोप लागली येऊ.

बाळ गेले झोपी
चिमणी गेली खोपी
संवर्धन करू चिऊचे
झाडावर बांधून खोपी.

- ज्ञानेश्वर चौधरी
हिंगणघाट जि.वर्धा.
८६६८८१६०७५



# आपल्या माहितीला उजाळा- भाग ४

महाराष्ट्र पक्षीमित्रसंघाच्या त्रैमासिकेचे प्रयोजन केवळ पक्षी निरीक्षण व ओळख या पर्यंतच मर्यादित राहत नाही. त्या संलग्नीत ज्ञान भांडाराची उजळणी करून घेण्यासाठी आपल्या माहितीला उजाळा हे सदर वाचकांच्या पुढ्यात ठेवत आहे. प्रत्येक अंकामध्ये दहा प्रश्नांचा संच दिला जाईल. वाचकांना त्याची उत्तरे शोधून आपल्याकडे असणाऱ्या महितीला उजाळा द्यायचा आहे.प्रत्येक प्रश्नासोबत पुरविलेला सुगावा संपूर्ण क्रियाकलापास रंजक बनवतील अशी अपेक्षा आहे. वाचकांनी आपली उत्तरे अंकामध्ये इतरत्र दिलेल्या उत्तरासोबत पडताळून पाहू शकता. या सदराबद्दल प्रश्न, चर्चा किंवा सूचनांचे स्वागत आहे.

–राघवेंद्र वंजारी
rvanjari@yahoo.co.in

## आपल्या माहितीला उजाळा प्रश्न उत्तरे

| क्र. | प्रश्नथोडी | मदत |
|---|---|---|
| १) | ... या पक्ष्याला उलट दिशेने उडण्याची क्षमता आहे. | आकाराने हा जगातला सर्वात लहान पक्षी आहे. |
| २) | ... हा रानपिंगळा संरक्षण दिन म्हणून साजरा करतात. | हा दिवस जागतिक पोलिओ दिन म्हणून स्मरणात ठेवला आहे. |
| ३) | ... चा नर पक्षी मादीसारखे पिसे धारण करतो. | त्याचे शासकीय नाव Cadidris pngnax असे आहे. |
| ४) | छायाचित्रातले पक्षी शास्त्रज्ञ ओळखा  | बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीमध्ये बहु काळ कार्यरत होते. |
| ५) | गटात न बसणारा पक्षी ओळखा...<br>टिटवी (V. indicus).<br>थिकनी (E. recurvirostris).<br>राखी खाटिक (L. meridionalis).<br>तणमोर (S. indica),<br>तित्तीर (F. pondicerianus). | हा पक्षी गवताळ प्रदेशात आढळतो. |
| ६) | गुजरात राज्याचा राज्य पक्षी कोणता? | हे पक्षी एका पायावर उभे राहून आराम करतात. |
| ७) | Haematopodidae या पक्षी कुटुंबात यांचा समावेश होतो. | हा पाणपक्षी जल प्रदूषणाचा निर्देशक आहे. |
| ८) | ... चे मराठी नाव? | हा जलरंग व उनादी यांच्या कुटुंबात गणला जातो. |
| ९) | तांबट या पुस्तकाचे लेखक कोण? | त्यांनी रानभूल हे पुस्तकही लिहिले आहे. |
| १०) | प्राणी पक्ष्यांच्या वर्तणुकीचा अभ्यास करणारी ज्ञानशाखा कोणती? | विल्यम व्हीलर याने ही संज्ञा मांडली |

## महाराष्ट्र पक्षिमित्रला आयजीइएन आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक पुरस्कार जाहीर

जगभरात पर्यावरण क्षेत्रात स्वयंपूर्तीने कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांच्यामधील स्वयंसेवकाचा सन्मान व्हावा व त्यांना समाजात ओळख निर्माण व्हावी या उद्‌शाने व आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन कार्यक्रमास सहकार्य व्हावे या दृष्टीने इन्स्टिट्यूशन ऑफ ग्रीन इंजिनिअर्स या आंतरराष्ट्रीय संस्थेतर्फे (IGEN) दिला जाणारा २०२१ चा आंतरराष्ट्रीय आयजीइएन आयव्हीडी स्वयंसेवक पुरस्कार (IGEN IVD Volunteer Reorganization -ward 2021) महाराष्ट्र पक्षिमित्र या महाराष्ट्रातील संस्थेस जाहीर झाला. नोंदणीकृत संस्था गटामधून मधून तारांकित संस्था (Star Organization Category) गटातील हा एकमेव पुरस्कार महाराष्ट्र पक्षिमित्र या संस्थेस जाहीर झाला. इतर पुरस्कारांमध्ये उदयोन्मुख संस्था गटातील पुरस्कार मेक्सिको येथील संस्थेस जाहीर झाला. याशिवाय स्वयंसेवक व्यक्ती करिता तारांकित स्वयंसेवक,




कृतीशील स्वयंसेवक, संशोधक स्वयंसेवक व उदयोन्मुख स्वयंसेवक अशा चार गटातून, भारत, ग्रीस, नायजेरिया, सिरीया अशा विविध देशातील एकूण ११ स्वयंसेवकांना हे पुरस्कार जाहीर झाले. दि. १० मे २०२२ रोजी या पुरस्काराची घोषणा आयजीइएन संस्थेच्या वेबसाईट वर करण्यात आली. पुरस्कारासाठी सर्वप्रथम प्रस्ताव पाठविल्यानंतर, छाननी नंतर संस्थेच्या कार्याची माहिती देणारा माहितीपट इत्यादी सादर केल्यानंतर निवडक प्रवेशिकांची मुलाखतीसाठी निवड आणि मुलाखतीनंतर पुरस्कार जाहीर अशा विविध स्तरातून पुरस्कारांची निवड केली गेली. सदर पुरस्काराचे वितरण संयुक्त राष्ट्रचे स्वयंसेवक प्रतिनिधी यांचे हस्ते आभासी पद्धतीने, आयजीइएन संस्थेच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात केले जाणार आहे.

महाराष्ट्र पक्षिमित्र ही एक चळवळ असुन, गेल्या ४० वर्षांपासून राज्यातील पक्षी मित्रांचे संघटन करून पक्षी अभ्यास, संवर्धन व जनजागृती यासाठी कार्यरत आहे. आजवर कुठलेही अनुदान न घेता राज्य स्तरीय ३४ पक्षिमित्र संमेलनाचे व ३० विभागीय संमेलनाचे आयोजन संस्थेच्या प्रयत्नातून पार पडले आहेत. आज संपूर्ण देशात पक्षी मित्रांचे संघटन असलेले महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. याच स्वयंपूर्ण कार्यामुळे संस्थेस हा पुरस्कार प्राप्त झाला असुन या पुरस्काराच्या रूपाने संस्थेच्या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे.

## बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या मानद सचिव पदी श्री. किशोर रिठे यांची नियुक्ती



मध्य भारतातील वन्यजीव संवर्धन श्रेत्रातील सर्वांना परिचित असलेले महाराष्ट्र पक्षिमित्रचे जेष्ठ सदस्य व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे कार्यकारी मंडळ सदस्य श्री. किशोर रिठे यांची पक्षी अभ्यास, वन्यजीव संवर्धन, जैवविविधता संशोधनात आणि जनजागृती या क्षेत्रात गेल्या १३७ वर्षापासून कार्यरत असलेल्या भारतातील अग्रगण्य अशा बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS) या संस्थेच्या मानद सचिव पदी निवड झाली. दि. १ जुलै रोजी झालेल्या BNHS कार्यकारी मंडळाच्या बैठकीत श्री. किशोर रिठे यांची सर्वानुमते ही निवड करण्यात आली. याशिवाय कार्यकारी मंडळावर दोन उपाध्यक्ष यांची सुद्धा निवड करण्यात आली.

या बैठकीत उपाध्यक्षपदी राज्याचे माजी अतिरिक्त मुख्य सचिव श्री. प्रवीण परदेशी तसेच बँकिंग क्षेत्रातील अग्रणी श्री पॉल अब्राहम यांची सुद्धा निवड करण्यात आली.

महाराष्ट्र पक्षिमित्रचे जेष्ठ सदस्य असलेले किशोर रिठे हे गेल्या तीन दशकापासून वने व वन्यजीव क्षेत्रात कार्यरत असून आदिवासी विकास व वन्यजीव संवर्धन या दोन्ही अंगांचा संतुलित विचार करून धोरणे राबविण्यासाठी ओळखले जातात. या महत्वपूर्ण पदावर निवड होणारे विदर्भातील ते पहिले प्रतिनिधी ठरले आहेत. श्री किशोर रिठे यांची BNHS च्या मानद सचिव पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे मनःपूर्वक अभिनंदन.

## बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या कार्यकारी मंडळ सदस्यपदी महाराष्ट्र पक्षिमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर आणि आजीवन सदस्य श्री. रोहन भाटे यांची निवड

भारतातील वन्यजीव संवर्धन, जैवविविधता संशोधनात आणि जनजागृती या क्षेत्रात गेल्या १३७ वर्षापासून कार्यरत असलेल्या भारतातील अग्रगण्य अशा बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS) या संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक नुकतीच पार पडली असून, दि. २२ जून रोजी झालेल्या मतमोजणी नंतर निवडणुकीचे निकाल जाहीर झालेत. यामध्ये महाराष्ट्र पक्षिमित्रचे अध्यक्ष, अमरावती जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक, वाईल्डलाईफ अँड एन्व्हायर्नमेंट कन्झर्वेशन सोसायटीचे सचिव डॉ. जयंत वडतकर तसेच महाराष्ट्र पक्षिमित्रचे माजी कार्यकारिणी सदस्य श्री रोहन भाटे शहा हे निवडून आले आहेत. भारतात १८८३ पासून कार्यरत असलेल्या अत्यंत नामांकित व प्रतिष्ठेच्या BNHS संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या सदस्य पदावर २०२२ ते २०२६ साठी ते निवडून आले आहेत. या निवडणुकीत विविध विभागातून एकूण ०८ सदस्य निवडून आले असून मध्य भारत विभाग, पूर्वोत्तर विभाग या दोन विभागातून प्रत्येकी एक आणि खुल्या नॉन रिजनल झोन मधून एकूण ०६ जागांसाठी ही निवडणूक पार पडली असून यामध्ये मध्य भारत विभाग मधून श्रीनिवासा मूर्ती, पूर्वोत्तर विभाग मधून श्री. कुलोज्योती लहकार आणि खुल्या प्रवर्गातून डॉ. जयंत वडतकर व श्री. रोहन भाटे यांचेसह, डॉ. आसद रहमानी, श्री. केदार गोरे, डॉ. शुभलक्ष्मी रेड्डी, डॉ. परविश पंड्या हे विजयी झाले आहेत.





बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS), स्थापना १५ सप्टेंबर १८८३ रोजी झाली, ही भारतातील संवर्धन आणि जैवविविधता संशोधनात गुंतलेली सर्वात मोठी गैर-सरकारी संस्था आहे. विज्ञान-आधारित संशोधन, संवर्धन समर्थन, पर्यावरण शिक्षण, जनजागृती, शास्त्रीय प्रकाशने, निसर्ग सहली आणि इतर कार्यक्रमांद्वारे निसर्गाबद्दल जागरूकता पसरवणे हे संस्थेचे प्राथमिक ध्येय आहे. डॉ. जयंत वडतकर व श्री. रोहन भाटे यांच्या रूपाने महाराष्ट्र पक्षिमित्र संस्थेचे दोन प्रतिनिधी हे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS) च्या कार्यकारी मंडळावर नियुक्त झाले आहेत. यापूर्वी महाराष्ट्र पक्षिमित्रचे जेष्ठ सदस्य श्री किशोर रिठे सुद्धा या संस्थेच्या कार्यकारी मंडळावर नियुक्त झालेले आहेत. महाराष्ट्र पक्षिमित्र साठी हि निश्चितच अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे डॉ. जयंत वडतकर व श्री. रोहन भाटे यांचे अभिनंदन.

***

## पक्षिअभ्यासक अनिल माळी यांना पीएच. डी. पदवी



महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे राज्य सहसंघटक व पक्षी अभ्यासक श्री. अनिल रतिलाल माळी (नाशिक) यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिक्षणशास्त्र विभागातून पक्षी प्रजातीविषयक उद्बोधनाकरिता इ-कृति कार्यक्रमाची निर्मिती व त्याची परिणामकारकता या विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादन केली. त्याबद्दल पक्षीमित्रच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. अनिल माळी हे खोरीपाडा येथील गिधाड उपहारगृह, शहरी पक्षी, स्थलांतरित पक्षी याबद्दल सातत्याने अभ्यास करीत आहेत.

# माळावरचा एक दिवस

राजकुमार कोळी,
राहुल वंजारी, राघवेंद्र वंजारी
सोलापूर. ९०२८७६९१८२

उधळीत शतकीरणा उजळीत जनहृदय
नभात आला रे प्रभात रवी उदया
तिमिराची रजनी गेली रे गेली लया

आकाशवाणीतून समूह गीत हलकं हलकं कानी पडू लागलं. हिवाळ्यातल्या एका सकाळी सोलापूरवरून निशेचं पांघरूण अलगदपणे पश्चिमेकडे सावरू लागले. सूर्योदयापूर्वीच गावात दिनचर्येला सुरुवात झाली होती, पसरणाऱ्या सोनेरी प्रकाशासोबतच त्यांची गती वाढली. माणसांप्रमाणे वृक्ष-वेली वाऱ्याच्या मंद आगमनाने डोलू लागल्या. रात्री विसाव्याला आलेली पाखरं कुजबुजू लागली. चिमण्या निरगुडीच्या फांद्यांमध्ये चिवचिवाट करू लागल्या. साळुंख्यांचा थवा अशोकाच्या मनोऱ्यारुपी झाडावरून गलका करत झेपावू लागला. चार पाच पोपटांचा थवा छपरांमधून रस्ता काढत आर पार उडाला. गाय बगळ्यांचे मोठे थवे दिवसाच्या पहिल्या उड्डाणासाठी तयार झाले. कुणी पंख फडफडत आहेत तर कुणी पंखांची साफ सफाई करतंय. वडावरच्या पांढुरक्या गर्दीत काही गायबगळे मान उंच करून भगव्या चोचीने विविध आकार गिरवत आहेत. एकामागून एक बगळे थारा सोडू लागले आणि चिमण्यांनीही आपली जागा भुर्रर्रर्र भुर्रर्रर्र करत सोडली.

दख्खनच्या पठारावर गारव्याने आपली पकड आवळली. येथे निसर्ग पर्यटनासाठी यापेक्षा उत्तम ऋतू आणखी कोणता? पहिल्याच सूर्यकिरणांपासून प्रारंभ झालेल्या दुचाकीचा प्रवास हैदराबाद द्रुतगती मार्गावर मार्गक्रमण करू लागला. तुरळक रहदारीस मागे टाकून बोरामणी गावाच्या उत्तरेस सरसावलो. सोलापूर जितके विविधतेने नटलेले आहे तितकेच त्याच्या बाह्य वलयात बहुरंगी बहुढंगी लावण्य खुलू लागले. शहराची हद्द ओलांडून ग्रामीण भागाच्या जवळ जाताना शेतमळ्यांनी मनाला हायसं केले. जोमाने वाढत असलेली बाजरी, मूग, सूर्यफूल तसेच फळभाज्यांनी व पालेभाज्यांनी आम्हाला नवी उमेद दिली. वाऱ्याच्या तालावर डोलणाऱ्या पालवीसोबत मनसुद्धा ताल धरू लागलं.

बोरामणी हे गाव पीर बाबा दर्गाहमुळे लोकप्रिय आहे. हा दर्गाह टेकडीवर असल्यामुळे हे धार्मिक स्थळ प्रेक्षणीय आहे. भाविकांची रेलचेल नेहमीच लागलेली असते. एकूण तीन टेकड्यापैकी मधल्या टेकडीवर दर्गाह स्थापित आहे. निसर्गभ्रमंती करणाऱ्या प्रत्येकाला या टेकड्यावर चालत जाऊन सभोवताल निहारण्याची इच्छा होणारच. यंदाच्या वर्षी पावसाने चांगली हजेरी लावल्याने रान सर्वत्र ओले होते. माळावर हिरवेगार गवत, लहानसहान पिवळी फुले आणि त्यावर असंख्य कीटक घोंगावत होते. मैदानात काळविटांचा कळप चरत होता. टेकडीवर आसन वजा मोठमोठे दगड असल्यामुळे निसर्गाची प्रकाशचित्रे टिपताना स्वतःलाही टिपण्याचा मोह आवरला नाही. छोट्या छोट्या पायवाटेवरून जलधारा आपली वाट काढत तळ्याकडे जाताना आपले मन वेधून घेत होते.

टेकडी उतरून दर्गाहच्या समोर आलो. दक्षिणेला असलेल्या एका विहिरीने आम्हाला स्वतःकडे आकर्षित केले. दुर्बिणीतून दिसत होते की विहिरीच्या आसपास बारीक हालचाल होत आहे. दोन राखीव वटवट्यांची ऊरपूर सुरू होती. बदामाच्या झुडुपात एका मागून एक येणे-जाणे. बाभळीच्या कमी उंचीच्या फांद्यावर बसणे. जमिनीवर बसणे - उडणे - पुन्हा बसणे. हे सारे अगदी तत्परतेने चालले होते. शेजारच्या वेड्या बाभळीवर बसून दोघेही मोठ्याने चीविककक...चीविककककक... असा आवाज करत होते. दोघेही एका सुरात ओरडताना त्यांची शरीर रचना एक विशिष्ट आकार घेते. पाय सरळ, छाती फुगलेली, खांदे मागे सारून चोच आणि शेपटी आकाशाकडे वळवून आकांताने चित्कारणे. ह्या अंतकरणातील हाकेचा आणि स्वतःच्याच धुंदीत गतिमान राहण्याचं कारण होतं त्याचं घरटं. या हंगामात त्यांनी पाच पिल्लांना जन्म दिला होता. साऱ्यांची भूक भागवण्यासाठी ते परिश्रम घेत होते. अन्यथा इतर कोणत्याही गोष्टीकडे पाहायला त्यांना फुरसत कुठे आहे? दोन्ही पालक एका पाठोपाठ एक अन्न आणायचे. आळ्या आणि बारीक कीटकांचा अधिक समावेश होता. एका वेळी केवळ एक किंवा

दोघांनाच भरवण्याची संधी होती. दोघेही प्रत्येक पिलाचे पोट भरण्याची खातरजमा करत होते. राखी वटवटे अनेक पाहिले, नेहमी पाहतो, परंतु हे जोडपं मात्र अविस्मरणीय झालं.

पाणबुडी पक्षी पाण्यात शिकारीवर असताना अचानक एक मासा पाण्याबाहेर उडी घेतो आणि शिकारीपासून सुटका करताना पाण्यात डुबुक... असा आवाज झाला. तो मासा पक्ष्यांच्या आणि आमच्या नजरेआड गेला.

दुपारी उन्हं तापल्यावर गर्द झाडांच्या सावलीत गुजबुज वाढली. साल वाढलेल्या बाभळीच्या खोडात कीटक सीक् सीक् सीक्... क्रिकरर क्रिकरर क्रिकरर... असा गूढ आवाज करू लागले. झाडांच्या पायथ्याला वसणाऱ्या गवतामध्ये नाकतोडे सट् सट् सट् सट् असा आवाज करत एका काडीवरून दुसऱ्या काडीवर झेपावत. दगडी पालव घाणेरीच्या फुलांभोवती रसप्राशनासाठी येणारा भुंगा आणि माशांचा घुंगणारा आवाज 'डॉप्लर परिणाम'ची आठवण देऊन गेले. हवेत उडताना त्यांचे चिमुकले पंख दिसले नाही, शरीरही पूर्णपणे नजरेस पडले नाही परंतु ते उडून गेलेल्या मार्गाचा एक अदृश्य नकाशा हवेत रेखाटून गेले. शांतता या आसमंतात आपलं अधिराज्य गाजवताना अनुभवत होतो. दूरपर्यंत पसरलेला पठार जणू रंगमंच. त्यावर ऊन सावल्यांचा खेळ मूक नाटिकेसारखा चालला होता त्यातून निखळ मनोरंजनाची पूर्तता होत होती. वस्त्यांतल्या माणूस प्राण्याची बडबड, शहरातल्या वाहनांची गर्दी, कारखान्यांतील यंत्रांचा गोंगाट इथपर्यंत पोहोचत नव्हता. पिटुकली, पितांबरीसारखी मिश्किल फुलपाखरे रंगीबेरंगी फुलांवर रसग्रहण करत परागीकरण करत होती, पण शांततेत. बहुरूपी फुलपाखरांची चंचल जोडी प्रणय क्रीडा करताना मनमोहक नाच करत होती परंतु तेही मौन धारण करून. इथे मौनही नाद उमटवत होता. त्यातून निर्माण होणारा लयबद्ध राग ऐकून कान तृप्त झाले. बेशरमी गर्द झुडुपामध्ये एक वारकरी पक्षी आपल्या गडद पोशाखात काट्यांच्या जाड गुच्छावर बसला होता. बऱ्याच वेळेच्या त्याच्या स्तब्ध अवस्थेने आम्हा निरीक्षकांच्या मनात कुतूहल निर्माण केले होते. पक्षी घरट्यामध्ये अंडी उबवत होता. पालकत्वाच्या व्रतामध्ये काही विघ्न नव्हतं. अधिवास त्याच्यासाठी पुरेपूर सज्ज होता. तळ्याच्या काठावर घरटं केलेल्या लाल टिटवीच्या जोडीने या भागावर आपलेच राज्य असल्याचे सांगताना बांधाकडे त्यांच्या आवाजाची डीटीरिटिव...डीटीरिटिव...,

टीटीरिटिव...टीटीरिटिव... अशी प्रतिध्वनी ऐकायला मिळते, त्यावेळी बाकी कुणीच आवाज केला नाही. चरल्यानंतर पाणी प्यायला आलेल्या बैलाच्या गळ्यातला घंटीनाद, शेळ्या-मेंढ्यांच्या पायातल्या घुंगरांचा आवाज आपोआपच हवेत विरून गेला. जनावरे पाण्याजवळ आली की, काठची बेडकं खोल पाण्यात धूम पळाली तर दूरची बेडकं सतर्कतेचा इशारा देत टर्रर्र..टर्रर्र..टर्रर्र..टर्रर्र..फटर्रर्र..फटर्रर्र..फटर्रर्र.. असा आवाज घुमवू लागली. यामध्ये बेडकांच्या दोन तीन प्रजाती असल्याचे समजते पण ही फटकार नेमकी कुठून येते हेच कळत नाही. काठावर बसलेली टिटवी आणि काळ्या टोपीचा कुदळ्या कर्णकर्कष्य आवाज काढत तळ्याच्या दुसऱ्या काठावर गेला. तलाव स्वतःमध्ये स्वयंभू आहेच. शिवाय तो एक पालकसुद्धा आहे. कारण तो सजीव सृष्टीला पोसतो आहे म्हणूनच तो स्वतः चिरायू आहे, असं वाटतं. ऋतुमानाप्रमाणे त्याचा चेहरा बदलतो. तो आटतो, तो सुकतो, पुनः भरतो, वाहतो, खळाळतो. त्याची जिवंत असल्याची लक्षणे किती मजेशीर आहेत ना! शेकडो पाळीव आणि जंगली जनावरे जसे काळवीट, मुंगूस, खार दिवसा पाणी प्यायला आली तर रानमांजर, उदमांजर, लांडगा, कोल्हा, खोकड, साळींदर, साप रात्री पाणी प्यायला आले. टिटवी, बेडकं, मुंगी, ढालकिडा, चंडोल, विरोळा, वटवट्या, धाविक, माळटिटवी, पाकोळी, पाखुर्डी यांनी आपली प्रजननं याच तळ्याचा अंगणात यशस्वी केली.पाऊलवाटेवरून आमची गाडी चालत होती. समोर एक दगडावर दोन पक्षी बसले होते. एक होता माळचंडोल आणि दुसरा पक्षी रिचर्डची चरचरी. चंडोल उडून गेला पण चरचरी दगडावर चोच घासत होता. काही वेळाने तो तोंडातून काहीतरी ओकला आणि उडून गेला. दगडा जवळून पाहिले तर लहान भुंग्याचे काही अवशेष तेथे आढळून आले. माळावर जनावरे चरत होती. गुरे राखणारा आणि त्याचा कुत्रा सोबत होता. त्यांच्याशी हलक्या-फुलक्या गप्पा गोष्टी करून आम्ही पुढे निघालो. आकाशात एक खरूची शिकारीच्या शोधात भटकंती करत होता. त्याने जमिनीकडे झेप घेतली.आम्ही झाडाचा आडोसा घेऊन लपून त्याच्याकडे पाहत होतो. तो एका बांधावर बसला. थोडा वेळ तो तिथेच थांबला होता. दुर्बिणीच्या साह्याने निरीक्षण करीत होतो.त्याने हवेत झेप घेतली आणि कीटकांना पकडू लागला.पाऊलवाटेवरून बाजूला येऊन आम्ही झाडाखाली विसावलो. दिवसभर दिसलेल्या विविध प्रजातींच्या निरीक्षणावर

थोडावेळ चर्चा रंगली. त्या दरम्यान आमच्या भोवती एक भोवत्या फिरत होता. त्याच्या आणखी लकबी पाहण्यासाठी वाट पाहत होतो पण तो फार वेळ थांबला नाही. त्याच्यावरून नजर हटते न हटते तोवर कंठवाला होलाची गुटूरगु... गुटूरगु... कानी पडली. समोरील बांधाच्या झाडावर बसला होता आणि आम्ही जाण्याची वाट पाहत होता कारण आम्ही ज्या झाडाखाली बसलो होतो त्या झाडावर त्याचं घरटं होतं, त्यामध्ये एक अंडेसुद्धा होते.

काटगाव परिसरात आल्यावर एका उंच विजेच्या खांबावर दोन शिकारी पक्षी बसलेले दिसले. आमच्यापासून कमीत कमी अर्धा किलोमीटर तरी दूर होते म्हणून त्यांची नेमकी ओळख पटणे कठीण होत होते. जसजसा खांबाजवळ जाऊ तसे कळले की, हे मोरघार गरुड आहेत. दोन पैकी एकाने हवेत भरारी घेतली. उंचीवरून गोल गिरक्या घेऊन जमिनीकडे आली. उजव्या बाजूच्या वारुळाच्या वरून मोरघार एक मोठी शिकार पायामध्ये पकडून जाताना दिसली. तिच्या पायात शेपटीसारखं दिसत होतं. परिसरात आवाज कमी होता. परंतु हालचाल अधिक होती. शिकारी प्राण्याला आपल्या मजबूत पंज्यात जखडून गरुड बांधावर आला. तेव्हा समोरचे चित्र अधिक स्पष्ट झाले, मोरघारीने एका घोरपडीला पकडले होते. गरुड उजवा पाय घोरपडीच्या मानेवर आणि डावा पाय त्याच्या पाठीवर ठेवून उभा होता. मजबूत नखांनी पकडून एक पाय उचलून सोडल्यासारखे करायचा आणि दुसरा पाय धरल्यासारखा करायचा. दुर्बिणीमधून पाहिल्यावर समजले की, घोरपड गरुडाच्या पायांमधून निसटण्यासाठी धडपड करत आहे. घोरपड जेव्हा सुटायचा प्रयत्न करत होती तेव्हा ती आपल्या शेपटीचा वापर करायची. शेपूट सतत जोरजोराने हलवायची, झटके द्यायची. शेपटीच्या हालचालीने गरुडाची नजर विचलित होत होती. शेपटीकडे ध्यान देताच घोरपडीने गरुडाच्या पायाला जोरात चावा घेतला.दरम्यान पंज्याची पकड क्षणार्धासाठी सुटली. घोरपडीने त्याचा फायदा घेत सरसर गवतामध्ये धाव घेतली. बांधाच्या आड लपण्याचा प्रयत्न करू लागली. सहजासहजी शिकार जाऊ देईल तो कसला गरुड! तो पुन्हा तिच्या मागे लागला. गवतामध्ये दडून बसलेली घोरपड मान वर करून गरुडाच्या पायाला चावण्याचा प्रयत्न करत होती. गरुड हवेतून झपाटा मारण्याचे आणि घोरपड जमिनीवरून जबड्याने चावण्याचे शर्तीचे प्रयत्न करत होते. दोघांना चावणे महत्त्वाचे होते. एकासाठी ते पोट भरणार होते तर दुसऱ्यासाठी बचाव तंत्र. अशाप्रकारे तीन-चार निष्फळ प्रयत्न झाले. शेवटी घोरपडीने आपली सुटका करून घेतली!

स्पेनमध्ये झालेल्या एका अभ्यासानुसार समजते की, मोरघारीचे शेकडा २८ टक्के शिकारीचे प्रयत्न यशस्वी होतात. ही टक्केवारी दोन महत्त्वाच्या घटकांवर अवलंबून आहे. शिकारी प्राणी आणि अधिवासाची रचना. शिकारीची गती, हवेत उडणे किंवा जमिनीवर धावणे इत्यादी महत्त्वाचे घटक ठरतात. त्याचबरोबर झुडुपांची घनता शिकारीच्या प्रयत्नात परिणामकारक ठरते.

दिवस मावळतीकडे झुकत होता. आम्ही परतीच्या रस्त्याला लागलो. त्या ठिकाणाहून काही अंतरावर पांढुरका भोवत्या आणि मोंटेग्यूचा भोवत्या उंच गवतामध्ये रात्री थांबण्यासाठी येण्याच्या तयारीत होते. तुळजापूरला जाणाऱ्या रस्त्यावर दगडाच्या खाणी आहेत. तेथे घुबडांचे वास्तव असेल या विचाराने खाणीत डोकावलो परंतु काही दिसले नाही.

काळोख वाढू लागला, पक्षी दिसणे कमी झाले. तुळजापूर नाक्याशेजारी हायवेच्या डाव्या बाजूला भरपूर पाणी साचले होते. चिलारीच्या झाडावर असंख्य बगळे जमले होते. रस्त्याच्या प्रकाशात फिकट फिकट पांढरे कापसाच्या बोंडक्यासारखा बगळ्यांचा थवा दिसत होता. विसावा घेत असलेल्या बगळ्यांचे शुभ्र प्रतिबिंब पाण्यात पडलेले पाहून दिवसभराचा थकवा क्षणार्धात दूर झाला. आम्ही मनभरून ते सुंदर दृश्य पाहिले. बराच वेळ त्या ठिकाणी थांबलो. त्या दिवसाचे ते शेवटचे दृश्य मनावर कोरून गेले. केवळ एका दिवशी इतके सारे प्राणी, पक्षी, घरटे, पिल्ले, अंडी, कीटक, त्यांचे जीवन पाहायला मिळालं. यावरून अशी शिकवण मिळाली की, निसर्गात आढळणारी प्रत्येक घटना स्वतः स्वयंपूर्ण आहे. तसेच निसर्गातच विवधांगी भूमिकेत, परिस्थितीकीय स्तरावर कार्यरत राहून जीवनाला अर्थपूर्णता देत आहेत. रंग, रूप, गायन, नृत्य या सर्वांनी युक्त बनलेला कलात्मक आविष्कार आहेत. निसर्गाचा हा न संपणारा खजिना सर्वांसाठी खुला आहे. इथला परिसर किती स्फूर्तीदायक आहे हे शब्दात मांडणे अतिशय कठीण आहे. निसर्गाच्या महाकाव्यातली एक काव्यपंक्ती अलवारपणे उलगडण्याचा प्रयत्न इतकेच म्हणता येईल. हे सारं काही सोलापूरचं वैभव आहे.ह्या श्रीमंती समोर मानवी मन सदैव वंदनीय आहे.

## सुभाष पुरोहित यांनी काढलेला फोटो ग्रीसमधील जागतिक प्रदर्शनात

हा फोटो ग्रीस येथे जून मध्ये भरणाऱ्या जागतिक प्रदर्शनासाठी वाईल्डलाईफ या विभागात निवडला गेला आहे. सात सुंदर ग्रीन बी इटर्स पक्षी येथे एकत्र बसलेले दिसत आहेत. असा क्षण क्वचितच सापडतो. जगभरातून आलेल्या ४००० छायाचित्रातून याची निवड झाली आहे. श्री. सुभाष पुरोहित यांना हे १९वे जागतिक अवॉर्ड अथवा मानांकन आहे.



******

## पानपूरक

### सोलापूरमध्ये लेसर फ्लॉरिकन

भारतामध्ये अतिदुर्मीळ झालेल्या लेसर फ्लॉरिकनची एक मादी नान्नजजवळ गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये सापडली होती. तिच्या पंखाला थोडी जखम झालेली होती. त्यावर उपचार झाल्यावर वन खात्याने माळढोक अभयारण्यात तिला मुक्त केले. (एफए अपडेट्सवरून)

### जगभरात चिमण्या वाढल्या

भारतात, विशेषत: शहरी भागात चिमण्या दिसेनाश्या झाल्या आहेत,असे ऐकावयास मिळते. जागतिक महत्त्वाच्या तीन संस्थांनी जमा केलेल्या आकडेवारीतून असे दिसते की, जगभरातील चिमण्यांची संख्या प्रथम क्रमांकावर आहे. ती आहे १.६ अब्ज. (वॉट्सॲपवरून)

### वन्य प्राण्यांना कायदेशीर अधिकार

इक्वेडोर हे पहिले राष्ट्र आहे, ज्याने वन्य प्राण्यांना कायदेशीर अधिकार बहाल केले आहेत. त्या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्यात हे अधोरेखित केले आहे.

******

## आपल्या माहितीला उजाळा प्रश्नांची उत्तरे –

१) हमिंगबर्ड
२) ... २४ ऑक्टोबर
३) भांडखोर पाणलावा Ruff.
४) हमायून अब्दुलाली
५) तणमोर
६) मोठा रोहित
७) कालव फोड्या H.ostralegus
८) करडा टिलवा Dunlin.
९) प्रल्हाद जाधव
१०) ईथोलॉजी

Book Post

प्रती,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : गौरी एंटरप्राइजेस, नाशिक
मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन